**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ याची जबानी**

मी याव्दारे शपथपूर्वक कथन करतो की,

माझे नाव – दत्तात्रय पांडुरंग वायळ

माझे वय वर्षे ३० व्यवसाय– शेती

राहणार– गोडेवाडी, केळी ओतुर, ता. अकोले, जि. अ.नगर

**सरतपास सहा.सरकारी वकील श्रीमती के.आर.उतळे यांचेमार्फत–**

**१.** दिनांक २७.०२.२०२१ रोजी सकाळी ११.०० ते ११.३० वाजताचे सुमारास पोलीस श्री. गोराणे यांनी मला केळी ओतूर येथील गोडेवाडी येथे पंचनाम्यासाठी बोलावले होते. त्यावेळी माझेसोबत माझा भाऊ विलास पांडुरंग वायळ हा पंचनाम्यासाठी हजर होता. ते घटनास्थळ फिर्यादी नामदेव धुला गोडे यांनी दाखवले. घटनास्थळ हे जमिनीच्या बांधावरुन गुरे जाणाऱ्या वाटेवर होते. त्या ठिकाणी भात शेती व हुलग्याचे पिक होते. तसेच तेथे मोठे झाडे होती. घटनास्थळाच्या पूर्वेला भात शेती व वालवड, पश्चिमेला फिर्यादी यांची भात शेती, दक्षिणेला आढा व उत्तरेला हरीभाऊ भागा गोडे यांचे घर आहे. पोलिसांनी त्या ठिकाणाहून एक दगड व काठी जप्त केली. त्यानुसार पोलिसांनी त्या ठिकाणी घटनास्थळाचा व मुद्देमाल जप्तीचा पंचनामा तयार केला. आता मला तो पंचनामा दाखविला. तो पंचनामा तोच आहे. त्या पंचनाम्यावर माझी सही आहे. ती सही मी ओळखतो. त्या पंचनाम्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्या पंचनाम्याला **निशाणी पी– २८** देण्यात आली. आता मला आर्टिकल अ वरील काठी दाखवली. ती काठी तिच आहे. आता मला आर्टिकल ब वरील दगड दाखवला. तो दगड तोच आहे.

**सरतपास पूर्ण.**

**<u>उलटतपास आरोपींतर्फे वकील श्री.आर.के.जोरवर यांचे तर्फे–</u>**

**२.** हे म्हणणे खरे आहे की, दुसरा पंच विलास पांडुरंग वायळ हा माझा सख्खा भाऊ आहे. माझे शिक्षण सातवी पर्यंत झाले आहे. मला लिहीता वाचता येत नाही. फिर्यादी नामदेव धुलाजी गोडे हा माझा सख्खा मामा आहे. माझे घर फिर्यादीचे घरापासून साधारण ३ कि.मी. अंतरावर आहे.

३. फिर्यादी व आरोपी यांचे दरम्यान शेतजमिनीवरुन वाद चालू आहे किंवा कसे, हे मला माहित नाही. मला पंचनाम्याला बोलवण्यासाठी पोलिसांनी लेखी नोटीस दिली नव्हती. पंचनाम्याला मला माझ्या मामाने बोलावले होते.

४. प्रश्न – तुमच्या मामाने तुम्हाला फोन करुन बोलावले होते की, निरोप देवून बोलावले होते ?

उत्तर – मी मामाला बघण्यासाठी गेलो त्यावेळी पोलीस पंचनामा करण्यासाठी आल्याने मामाने मला पंचनाम्यासाठी नेले.

५. मामाला बघण्यासाठी मी स्वत: गेलो होतो. त्यासाठी मी मामाच्या घरी गेलो होतो. मी सकाळी ८.३० वाजताचे दरम्यान मामाला पाहण्यासाठी गेलो होतो. पोलीस सकाळी ११.०० ते ११.३० वाजताचे दरम्यान आले होते. माझा भाऊ विलास हा सकाळी १०.०० वाजताचे दरम्यान मामाला पाहायला आला होता. पोलीस मामाच्या घरी आल्यानंतर ते घटनास्थळी १२.०० ते १२.३० वाजताचे दरम्यान पोहचले. पोलिसांसोबत मी, माझा भाऊ, माझे मामा व मामी हे होते.

६. घटनास्थळी असलेली जागा कोणाच्या मालकीची आहे, हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही घटनास्थळी पंचनाम्यासाठी गेलेलो नसल्याने ती जागा कोणाच्या मालकीची आहे, हे मला सांगता येणार नाही.

७. प्रश्न – तो दगड व काठी तुमच्या मामाने पोलिसांना दिली?

उत्तर – माझ्या मामाने पोलिसांना तो दगड व काठी दाखवली.

८. हे म्हणणे खरे नाही की, मी मामाच्या सांगण्यावरुन पंचनाम्यावर सही केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, तो पंचनामा मामाच्या घरी तयार केला व त्यावर मी व माझ्या भावाने सह्या केल्या. हे म्हणणे खरे नाही की, पंचनामा माझेसमोर तयार केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासामध्ये केलेली सर्व कथने खोटी आहेत. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझे समोर कोणताही पंचनामा केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या वैयक्तीक माहितीवरुन घटनास्थळाच्या चतु:सिमा सांगितल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझे समोर घटनास्थळावरुन दगड व काठी जप्त केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी मामाचे सांगण्यावरुन त्याला मदत करण्यासाठी पंचनाम्यावर निव्वळ सही केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या समोर कोणताही पंचनामा झालेला नसताना निव्वळ मामाला मदत करण्यासाठी मी या कामी खोटी साक्ष देत आहे.

**ऊलटतपास पूर्ण फेरतपास नाही**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत
सदरचा जबाब माझे समक्ष नोंदविणेत आला.

DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Digitally signed by DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Date: 2025.09.23 17:55:21 +0530

**(डी.एम.हिंग्लजकर)**
**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, अकोले,**
**ता.अकोले, जि.अहमदनगर**

**दिनांक – २२.०९.२०२५**